पुण्यनगरी




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अधिष्ठाता एस. एस. महाजन, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील.

लोकमत

# कोविड सेंटरमुळे विद्यापीठातील प्रवेश प्रतिबंधित

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : महानगरपालिकेच्या वतीने शिवाजी विद्यापीठातील वसतिगृहे कोविड केअर सेंटरसाठी अधिग्रहित केली आहेत. त्यामुळे पुढील आदेश होईपर्यंत विद्यापीठ परिसर तात्पुरत्या स्वरूपात प्रतिबंधित केला आहे. सर्व अभ्यागतांसाठी विद्यापीठ परिसरामध्ये प्रवेश प्रतिबंधित केला आहे.

विद्यापीठाचे प्रवेशद्वार क्रमांक एक आणि सहा केवळ विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, सेवक व विद्यापीठ निवासस्थानांमध्ये राहणाऱ्या शिक्षक, अधिकारी, सेवकांच्या कुटुंबीयांसाठी खुली राहतील. प्रवेशद्वार क्रमांक आठ हे वसतिगृहांमधील कोविड सेंटरच्या रुग्ण आणि अनुषंगिक शासकीय वाहनांसाठी खुले राहणार आहे.

Kolhapur Main
Page No. 3 Apr 15, 2021
Powered by: erelego.com

# शिवाजी विद्यापीठात अभ्यागतांना प्रवेशबंदी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाचा वाढता संसर्ग, जिल्ह्यात लागू केलेली संचारबंदी आणि विद्यापीठ वसतिगृहात कोरोना काळजी केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठ परिसरात शिक्षक, अधिकारी, सेवक तसेच विद्यापीठ निवासस्थानांमध्ये वास्तव्यास असणाऱ्या शिक्षक, अधिकारी, सेवक यांचे कुटुंबीय वगळता अन्य अभ्यागतांना तात्पुरती प्रवेशबंदी करण्यात आल्याचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगितले.

विद्यापीठ प्रवेशद्वार क्रमांक १ व ६ हे फक्त विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, सेवक व निवासस्थानांमध्ये वास्तव्यास असणाऱ्या शिक्षक, अधिकारी, सेवक यांचे कुटुंबीयांकरिता खुली राहतील. प्रवेशद्वार ८ फक्त वसतिगृहातील कोरोना सेंटरच्या रुग्ण व अनुषंगिक शासकीय वाहनांकरिता खुले राहील. परीक्षेच्या कामकाजाकरिता शिक्षक, अधिकारी, सेवक यांना विभागप्रमुखांच्या परवानगीने प्रवेशद्वार क्रमांक १ व ६ मधून प्रवेश दिला जाईल.

सकाळ

# विद्यापीठात कोव्हिड केंद्र सुरू

**कोल्हापूर, ता. १४ :** शिवाजी विद्यापीठातील मुलांच्या वसतिगृहामध्ये आजपासून कोव्हिड केंद्र सुरू केले. त्यामुळे विद्यापीठ परिसरात अभ्यागतांना प्रवेश बंदी केली आहे. संचारबंदीच्या काळात विद्यापीठाची दोनच प्रवेशद्वारे खुली ठेवण्यात येणार असून यामधून केवळ कर्मचारी, अधिकारी आणि विद्यापीठ आवारात राहाणाऱ्या लोकांनाच ये जा करता येणार आहे. अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

Kolhapur, Main
15/04/2021 Page No. 3

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या आजपासून ऑनलाईन परीक्षा

## द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमांचा समावेश : चार सत्रांत आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेतील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या द्वितीय वर्षातील परीक्षा आज, गुरुवारपासून ऑनलाईन स्वरूपात सुरू होणार आहेत. या परीक्षांच्या पहिल्या दिवशी विविध विषयांचे सुमारे १५० पेपर होणार आहेत. दिवसभरात चार सत्रांमध्ये ही परीक्षा होईल.

कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू लागल्याने विद्यापीठाने ६ ते १२ एप्रिल दरम्यानच्या परीक्षा स्थगित केल्या. या कालावधीतील पेपर संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षांच्या अखेरीस आणि दिनांक १५ एप्रिलपासून सर्व परीक्षा ऑनलाईन स्वरूपात घेण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला. त्यादृष्टीने विद्यापीठातील अधिविभाग आणि कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांना सूचना केली. बी. ए., बी. कॉम., बी.



### ऑनलाईन परीक्षेचे स्वरूप

- वेळ : एक तास
- पेपरमधील प्रश्न : २५ (एमसीक्यू स्वरूपातील)
- गुण : ५०

एससी., बीबीए., बीसीए., एम. ए., एम. कॉम., एम. एससी, आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा आजपासून ऑनलाईन स्वरूपात होणार आहेत. दिवसभरात सकाळी साडेदहा ते साडेअकरा, दुपारी साडेबारा ते दीड, दुपारी अडीच ते साडेतीन, दुपारी साडेचार ते सायंकाळी साडेपाच या सत्रांमध्ये परीक्षा घेण्यात येणार आहेत. अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र, आदी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा क्लस्टर महाविद्यालयांतर्फे ऑनलाईन होतील, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

### 'ऑफलाईन' १७ हजार विद्यार्थी

ऑफलाईन परीक्षा देण्याचा पर्याय सुमारे ५२ हजार विद्यार्थ्यांनी नोंदविला होता. या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षेचा पर्याय निवडावा, असे आवाहन विद्यापीठाने केले. त्यावर ३५ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पर्याय निवडला, तर १७ हजार विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षा देण्याचा पर्याय कायम ठेवला आहे. या ऑफलाईन विद्यार्थ्यांची परीक्षा कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर घेण्यात येणार आहे.

सकाळ

# डॉ. आंबेडकरांमुळे देशाची अखंडता अबाधित : डॉ. खरे

## डॉ. आंबेडकर संशोधन केंद्रातर्फे ऑनलाईन व्याख्यान



कोल्हापूर, ता. १४ : भारताची एकता व अखंडता अबाधित ठेवण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेतील परराष्ट्र व संरक्षणविषयक कलमांद्वारे अत्यंत कुशलतेने केले आहे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास अधिविभागाचे तसेच संरक्षण व रणनितिक अभ्यास अधिविभागाचे प्रमुख डॉ. विजय खरे यांनी आज येथे केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि विकास केंद्राच्या वतीने ‘डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय संरक्षणविषयक विचार’ या विषयावर आयोजित विशेष ऑनलाईन व्याख्यानामध्ये ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. डॉ.खरे म्हणाले, ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रीय सुरक्षाविषयक विचारांकडे अत्यंत सजगपणाने पाहण्याची गरज आहे. भारताची एकता, अखंडता जपण्यासाठी, या देशाला कायम एकसंध राखण्यासाठी बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेत ३५२, ३५६ आणि ३०७ या तीन कलमांची केलेली योजना फार बहुमोल स्वरूपाची आहे. एखाद्या राष्ट्राने लष्करी कारवाई केल्यास ३५२ कलमाच्या आधारे राष्ट्रपती राष्ट्रीय आणीबाणी जाहीर करू शकतात. एखाद्या वेळी काही कारणांनी देश आर्थिक संकटात सापडल्यास ३०७ कलमाच्या आधारे राष्ट्रपती राष्ट्रीय आर्थिक आणीबाणी जाहीर करू शकतात. यातील कलम ३५६ हे अत्यंत महत्त्वाचे कलम आहे. देशाची अंखडता आणि एकता राहण्यामध्ये आंबेडकरांचे योगदान फार मोठे आहे.’

या वेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन यांनी परिचय करून दिला. डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले.

तरुण भारत

# विद्यापीठाच्या आजपासून ऑनलाईन परीक्षा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आज (दि. १५) पासून सर्व परीक्षा ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत. यामध्ये बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., बीसीएस, एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी.च्या १५० पेक्षा अधिक विषयांच्या परीक्षांना प्रारंभ होणार आहे. ५० हजार पेक्षा जास्त विद्यार्थी ऑनलाईन परीक्षा देतील. विद्यार्थ्यांना काही अडचण आल्यास विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील हेल्पलाईन क्रमांकाशी संपर्क साधावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.



शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर–नोव्हेंबर हिवाळी सत्रातील परीक्षा २२ मार्चपासून सुरू झाल्या होत्या. परंतू कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ६ ते १२ एप्रिल दरम्यानचे पेपर पुढे ढकलण्यात आले होते. त्यामुळे क्लस्टर पध्दतीने घेण्यात येणाऱ्या औषध निर्माणशास्त्र, विधी, व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, वास्तुनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी या अभ्याक्रमाच्या परीक्षांनाही आज (दि. १५) पासून सुरूवात होणार आहे.

## शिवाजी विद्यापीठ

कोल्हापूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी झाली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव

Kolhapur, Kolhapur-Today
15/04/2021 Page No. 4

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 APR 2021 तरुण भारत

# 'घटनाकार' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

## राधानगरी, कागल, शहर परिसरात विविध संस्था, संघटनांकडून प्रतिमा पूजन, ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन

**भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध संस्था, संघटनांकडून त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.**



प्रतिनिधी
कोल्हापूर

**▪ शिवाजी विद्यापीठ**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव आदी उपस्थित होते.

**▪ जिल्हा बहुजन माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस संस्था समिती अध्यक्ष राहूल माणगावकर, वसूली अधिकारी समीर कळवे, सदस्य रघुनाथ मांडरे, यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी संचालक रवींद्र मोरे, व्यवस्थापक बाबुराव साळोखे, नंदकुमार कांबळे, ज्येष्ठ संचालक प्रकाश पोवार, हिंदुराव पनोरेकर, सुजाता भास्कर, विकास कांबळे, बाबुराव साळोखे आदी उपस्थित होते.

**▪ जय भारत हायस्कूल**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस संस्थेच्या उपाध्यक्षा सुमित्रा जाधव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका अश्विनी पाटील, अरूण कुमार, व्ही. एन. कांबळे, एम. वाय. निकाडे आदी उपस्थित होते.

**▪ कमला कॉलेज**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतिनिमित्त प्रभारी प्राचार्य अनिल घस्ते यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी उपप्राचार्य पी. एस. जाधव, डॉ. अनघा पाठक, डॉ. सुजय पाटील, अधिक्षक एम. बी. शिंदे, एच. व्ही. पुजारी, ज्योती गावडे आदी उपस्थित होते.

**▪ शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समिती**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बिंदू चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास डॉ. प्रविण कोडोलीकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. चांगदेव बंडगर, महेश राठोड, विराज सुतार उपस्थित होते.

**▪ मिस क्लर्क हॉस्टेल**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस संस्थेचे चेअरमन नानासाहेब माने यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव दिपक कांबळे, संचालक राजेश माने, प्रा. सतिश माने, शशिकांत कसबेकर, रोहित विणकरे, सातापा साठे आदी उपस्थित होते.

**▪ करवीर नगर वाचन मंदिर**

करवीर नगर वाचनमंदिर येथे डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस अध्यक्ष डॉ. नंदकुमार जोशी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष नंदकुमार मराठे, उपकार्याध्यक्ष डॉ. श्रीकृष्ण साळोखे, संचालक अनिल वेल्हाळ, उदय सांगवडे, ग्रंथपाल मनिषा शेणई आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अधिष्ठाता एस. एस. महाजन, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील.**

**▪ जिल्हा परिवीक्षा व अनुरक्षण संघटना**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस संस्थेचे उपाध्यक्ष सुरेश शिपूरकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शिपूरकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याची माहिती उपस्थितांना सांगितली. यावेळी मानद कार्यवाह पद्मजा तिवले, अधीक्षक पी. के. डवरी, सचिन माने, द्रौपदी पाटील, नजिरा नदाफ, मीना कालकुंद्री, स्मिता वायचळ आदी उपस्थित होते.

**▪ भारतीय शेतकरी कामगार पक्ष**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस संघटनेचे अध्यक्ष मोहन पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शेकापचे शहर चिटणीस बाबुराव कदम, दिलीपकुमार जाधव, संग्राम माने, आशिष चिले, झाकीर पटेल, प्रताप गायकवाड, दत्तात्रय पाटील आदी उपस्थित होते.

**▪ दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँन्ड इंडस्ट्री**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस इंडस्ट्रीचे अध्यक्ष संजय वाघ यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. डॉ. आंबेडकर यांना अभिवादन म्हणून शोषीत, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाला आर्थिक, शैक्षणिक, सामाजिकदृष्ट्या सक्षम करणे, उपेक्षितांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ध्येय धोरणे ठरवण्याचा संकल्प करण्यात आला. यावेळी राजेंद्र चौगुले, आदित्य वाघ, गौतम कांबळे, प्रशांत शेंडगे, विलास सोनुले, जान्हवी चौगुले आदी उपस्थित होते.

**▪ कोल्हापूर (जिल्हा) बौध्द-अवशेष व विचार संवर्धन समिती**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बिंदू चौकातील डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास संस्थेचे अध्यक्ष टी. एस. कांबळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी चित्रकला, एकपात्री अभिनय, व्हीडीओ निर्मिती, एकांकीका, कथाकथन, निबंध लेखन ऑनलाईन स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी कार्याध्यक्ष बापूसाहेब कांबळे, सेक्रेटरी सर्जेराव थोरात, विपुल वाडीकर, अजित कांबळे, स्वाती काळे, अर्जुन कांबळे, संजय माळी, संपत घोलप, युवराज कांबळे आदी उपस्थित होते.

**▪ पीपल्स ऐज्युकेशन सोसायटी**

पीपल्स ऐज्युकेशन सोसायटी अंतर्गत प्रबुध्द भारत हायस्कूल व प्रबुध्द भारत प्राथमिक विद्यालयाच्या वतीने डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस संस्थापक ॲड. बबन अर्दाळकर, अध्यक्ष अनिरूध्द अर्दाळकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. बुध्द वंदना, भिम वंदना झाल्यानंतर मान्यवरांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेतला. प्रशांत काळे यांनी भारताचे संविधान वाचून दाखवले, 'जय भीम करा', 'दलितांचा राजा' अशी भिम गीते सादर केली. यावेळी सेक्रेटरी शन्मुख अर्दाळकर, संचालक अभिजित अर्दाळकर, मुख्याध्यापक संजय अर्दाळकर, मुख्याध्यापक पांडूरंग रामाणे, प्रफुल्ल मुनसे, आदी उपस्थित होते.

**▪ कोल्हापूर जिल्हा खादी व ग्रामोद्योग संघ**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस अध्यक्ष सुंदरराव देसाई यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ स्वातंत्र सैनिक प्राचार्य व्ही. डी. माने होते. देसाई यांनी महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेतला. दादासाहेब जगताप, प्रा. सुजय देसाई, प्रा. सदाशिव मनुगडे, मुख्याध्यापक एस. एस. सावंत, विष्णूपंत अंबपकर, पी. के. पाटील, आर. डी. पाटील, सविता देसाई, छाया भोसले यांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

तरुण भारत

# विद्यापीठातील वसतिगृहात कोविड काळजी केंद्र

कोल्हापूर : कोरोनाचा प्रादुर्भाव वाढल्याने शिवाजी विद्यापीठातील सर्व वसतिगृह कोविड काळजी केंद्रासाठी जिल्हा प्रशासनाच्या ताब्यात देण्यात आली आहेत. त्यामुळे विद्यापीठाच्या गेटनंबर १ व ६ मधून विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, रहिवासी, महापालिका अधिकारी, प्रशासकीय वाहनांकरीता खुले राहिल. इतरांना विद्यापीठात प्रवेश दिला जाणार नाही, तरी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे. विद्यापीठातील गेट नंतार ८ फक्त कोरोना रूग्णांसाठी खुले राहिल. विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयाचे विद्यापीठात अतीमहत्वाचे काम असल्यास विद्यापीठात प्रवेश दिला जाईल. तरी संबंधीत महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी अतिमहत्वाच्या कामाकरीता व परीक्षेच्या कामकाजाकरीताच विद्यापीठात यावे. कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने कामाशिवाय कोणीही विद्यापीठात येवू नये आशा सूचना करण्यात आल्या आहेत.